ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्वांकिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 4434. Licence No. 83.

वर्ष २५ पुणें, बुधवार तारीख ११ मार्च, १९५९ अंक १०

## विविध माहिती

**ब्रिटिश पंतप्रधानांची अणुनगराला भेट**—मॉस्कोपासून ८० मैलांवर रशिआचें अणुसंशोधन केंद्र वसलेलें आहे. ब्रिटनचे पंतप्रधान मि. मॅक्मिलन ह्यांनीं आपल्या रशियाच्या दौऱ्यांत ह्या केंद्राला भेट दिली. ब्रिटनमधील हारवेल ह्या अणुसंशोधन केंद्रांत काम करणारा विख्यात अणुशास्त्रज्ञ ब्रुनो पॉंटेकार्व्हो सध्यां तेथें काम करीत आहे. कांहीं वर्षांपूर्वी तो ब्रिटनमधून अचानक नाहींसा झाला होता.

**औषधांचा कारखाना**—सोव्हिएट रशिआच्या सहकार्यानें काढण्यांत यावयाचा औषधांचा कारखाना काश्मीरमध्यें काढण्यांत यावा असा आग्रह काश्मीरचें सरकार धरीत आहे. काश्मीरमध्यें औषधासाठीं लागणाऱ्या अनेक वनस्पतींची लागवड २,००० एकर जमिनींत करण्यांत येत आहे. कारखान्यासाठीं लागणाऱ्या वनस्पतींच्या पुरवठ्यापैकीं ८० टक्के पुरवठा काश्मीर-मधूनच होणार आहे. म्हणून हा आग्रह धरण्यांत येत आहे.

**सहकारी शेतीची पूर्वतयारी**—राजस्थान सरकारनें सहकारी शेती स्थापन करण्याची पूर्वतयारी म्हणून राज्यांत असलेल्या पडीक जमिनींची व जमिनींविरहित असलेल्या मजुरांची गणना करण्याचें ठरविलें आहे. राजस्थानांत सोडियम सल्फेट तयार करण्याचा एक कारखानाहि काढण्यांत येणार आहे. कारखाना सार्वजनिक मालकीचा राहील.

**कराचीमधील निर्वासित**—कराची शहराच्या लोकसंख्येची गणना नुकतीच करण्यांत आली असतां शहरांत सुमारें १,२५,००० निर्वासितांचीं कुटुंबें असून त्यांनीं आपला मुक्काम मोकळ्या जागा व रस्त्याकडेचे पादचारी मार्ग ह्यांवर ठोकलेला आहे, असें आढळून आलें. ह्या निर्वासितांपैकीं ६० टक्के लोक मजूर आहेत. फाळणीपूर्वी त्यामधील १० टक्के लोक शेतकरी होते.

**खंबायत भागांत सांपडणारें तेल**—मध्य गुजरातमधील तेलाच्या सांठ्याचा शोध लावण्याचे प्रयत्न लवकरच सुरू होतील. खंबायत भागांत सांपडूं शकणाऱ्या तेलासंबंधीं रशिअन तज्ज्ञानें केलेला अंदाज ३ कोटी टनांचा आहे. त्याच्या मताप्रमाणें लुनेज व त्याच्या आसपासच्या भागांतून दरसाल १५ लाख टन तेलाचें उत्पादन होऊं शकेल.

**पहिली बंगाली कादंबरी**—बंगाली भाषेंतील पहिली कादंबरी मिसेस मुलिन्स नांवाच्या इंग्रज स्त्रीनें लिहिली व ती १८५२ सालीं प्रसिद्ध झाली, अशी माहिती कलकत्त्याच्या नॅशनल लायब्ररीनें जाहीर केली आहे. कादंबरी २०० पृष्ठांची असून ती वाचनालयांतील एका दुर्लक्षिलेल्या भागांत सांपडली. ग्रंथकर्ती कलकत्त्यांतच जन्मली व तेथेंच वारली.

**खेळाच्या सामानाची बाजारपेठ**—खेळाच्या सामानाची भारतामधून जी निर्यात होते तिला पाकिस्तानकडून स्पर्धा होऊं लागल्यामुळें कांहीं बाजारपेठा गमावल्या गेल्या आहेत. ह्या सामानाचें उत्पादन व निर्यात वेगवेगळ्या संघटनांकडून होत असल्यामुळें पाकिस्तानच्या मालापेक्षा माल महाग विकला जातो. उत्पादन व निर्यात एकाच संघटनेकडून करण्याची सूचना करण्यांत येत आहे.

**ध्वनिक्षेपणाची यंत्रसामुग्री**—अखिल भारतीय रेडिओच्या उपयोगासाठीं एका स्विस कंपनीकडे दोन ध्वनिक्षेपक यंत्रांची मागणी नोंदविण्यांत आली आहे. रेडिओच्या मध्यम लहरींच्या केंद्रासाठीं उपयोगीं पडेल अशी ती आहे. पैकीं एक केंद्र दिल्ली-जवळ व दुसरें तिरुचिरापल्लीजवळ उभारण्यांत येणार आहे. ह्या कंपनीकडून घेतलेल्या ध्वनिक्षेपकांची संख्या आतां १० होईल.

**मध्यप्रदेशांतील लोखंडाच्या खाणी**—मध्यप्रदेशांतील लोखंडाच्या खाणींचा उपयोग करून घेण्यासाठीं जपानमधील पोलादाच्या कारखान्यांचे प्रतिनिधी लवकरच भारतांत येणार आहेत. भारतामधील लोखंडाच्या खाणींबद्दल जर्मनी व इटली अधिक आस्था दाखवूं लागल्यामुळें जपानी कारखानदार करार-घाटी सुरू करण्याची घाई करीत आहेत. मध्यप्रदेशांतील खाणीं-मधून ८० लाख टन अशुद्ध लोखंड मिळविण्याचा जपानचा संकल्प आहे.

**रशिआ–चीन व्यापारी करार**—रशिआ व चीन ह्यांच्या दरम्यान एक व्यापारी करार करण्यांत आला आहे. करारान्वयें उभयतां देशांत ७२० कोटी रूबल्स अथवा ६४·२ कोटी पौंड किंमतीच्या मालाची देवाण-घेवाण होईल. रशिया चीनला अवजड यंत्रसामुग्री, विशेषतः विजेच्या निर्मितीची पुरविणार आहे व चीनकडून कापूस, चहा, रेशीम, फळें, इत्यादि माल घेणार आहे.

**डच मळ्यांचें राष्ट्रीयीकरण**—इंडोनेशिआच्या सरकारनें देशांतील तंबाकूच्या मळ्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविलें आहे. इंडोनेशिआंत डच लोकांच्या मालकीचे तंबाकूचे ३८ मळे आहेत. इंडोनेशिआंतील मळ्यांकडून तंबाकू विकत घेणाऱ्या युरोपियन कंपन्यांविरुद्ध इलाज योजण्याची धमकी डच मळे-वाल्यांनीं दिली आहे.

**इतिहास ग्रंथाला बक्षीस**—बिहार विद्यापीठांतील प्राध्यापक डॉ. घोष ह्यांनीं लिहिलेल्या भारताचा इतिहास ह्या ग्रंथाला मध्यवर्ती सरकारच्या शिक्षणखात्यानें ५,००० रुपयांचें बक्षीस दिलें आहे. आतां ह्या ग्रंथाचें हिंदींत भाषांतर करण्यांत येणार असून तें सरकारतर्फे प्रसिद्ध करण्यांत येईल.




**तुम्ही कोणासाठी पैसे मिळवितां?...**

तुम्हांला वाटतं बायकामुलांसाठी. पण प्रत्यक्ष काय करतां हें बघितलं काय? पगार झाल्यावर तुम्ही आधीं वाणी, दूधवाला, डॉक्टर, घरवाला, कापडवाला यांची बिलं चुकतीं करतां आणि मग उरलेले पैसे मुलाबाळांसाठीं. उद्यां तुम्ही नसलांत तरी ह्या सर्वांना हें पैसे द्यावे लागणारच. फार तर थोडे कमी, एवढेंच. त्यासाठीं आधीं कांहीं विशिष्ट रक्कम विम्यांत गुंतविलीत तर आपला व कुटुंबाचा भावी काल सुरक्षित होईल.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया**

सेंट्रल ऑफिस : "जीवन केंद्र" जमशेटजी टाटा रोड, मुंबई-१

PRATIBHA/LIC 6

# अन्नाचें रहस्य





बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —



**किर्लोस्कर**

**अिलेक्ट्रिक पंपिंग सेट**

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.
आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारक रीत्या काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि., किर्लोस्करवाडी, द. सातारा.**

# अर्थ

बुधवार, ता. ११ मार्च, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ठेवीदारांना छोटीं कर्जें

### इंडियन ओव्हरसीज बँक व देना बँक ह्यांची योजना

कमी ऐपतीच्या ठेवीदारांना गरजेच्या जिनसा खरेदी करण्यास मदत करण्याकरितां छोटीं कर्जें देण्यास ब्रिटिश बँकांनीं गेल्या वर्षीं प्रारंभ केला; त्याचें अनुकरण हिंदी बँका करूं लागल्या आहेत. छोट्या असामींना बँकांतून कर्जें मिळण्याची सोय अद्याप पुरेशा प्रमाणांत आढळत नाहीं; कित्येक बँकांना छोटीं खातीं त्रासदायकच वाटतात. सर्व्हिस चार्जेस वाढवून व इतर मार्गांनीं त्यांना खातीं बंद करण्यास प्रवृत्त करण्याचा मार्ग कांहीं बँका अवलंबितात. थोडक्यांत म्हणजे, छोटे ठेवीदार आणि छोटे कर्जदार, दोघांनाहि बँकांचा फायदा पुरेसा मिळत नाहीं. संसारोपयोगी महाग जिनसा सबंद किंमत एका रकमेनें देऊन विकत घेणें मध्यमवर्गीयांना शक्य होत नाहीं आणि त्यांच्या रहाणीचा दर्जा सुधारूं शकत नाहीं. पंखे, सायकली, मोटारसायकली, मोटार गाड्या, रेडिओ, इलेक्ट्रिक मोटारी, शिवणाचीं यंत्रें, रेफ्रिजरेटर्स, इत्यादींचा उल्लेख ह्या संबंधांत करतां येईल.

लहान ठेवीदारांना अशा जिनसांच्या खरेदीसाठी कर्जें देण्याची योजना इंडियन ओव्हरसीज बँक लि. नें आखली आहे. बँकेंत खातें असणाराला हें कर्ज मिळूं शकतें. तीस महिन्यांपर्यंतच्या मासिक हप्त्यांनीं कर्जफेड करावयाची असते. त्यानें आपल्या दरमहा उत्पन्नाची व खरेदी करावयाच्या जिनसाची बँकेस कल्पना द्यावयाची. खात्रीच्या दुकानांतील जिन्नस निवडून, बँकेंत त्या जिनसाच्या ठराविक प्रमाणांत रक्कम खरेदीदारानें भरावयाची. बँकेनें दुकानदाराला खरेदीची पुरी किंमत द्यावयाची. खरेदीदार–ठेवीदारानें बँकेच्या मासिक हप्त्याइतकी तरी बचत करून बँकेचें देणें भागवायला हवें. त्यानें बँकेला सूचना देऊन, आपल्या खात्यांतील रकमेंतून हप्ता वळता करून घेण्यास सांगितलें म्हणजे सोईचें पडतें. बँक त्याप्रमाणें त्याला पावती धाडील.

खरेदीदार हाच जिनसाचा मालक असतो. पण शेवटचा हप्ता भरेपर्यंत बँकेचा त्यावर बोजा राहील, असें तो लिहून देतो. खरेदीदार जिन्नस काळजीपूर्वक वापरील, हें गृहीत आहे. इंडियन ओव्हरसीज बँकेच्या योजनेप्रमाणें, अशा कर्जाची किमान रक्कम १५० रु. असते, तर कमाल रकमेची मर्यादा १०,००० रु. असते. कर्जावर ६% व्याज आकारलें आतें. हें व्याज सबंध कर्जाच्या रकमेवर आणि सबंद मुदतीसाठी आगाऊ द्यावें लागतें. ह्याचा अर्थ, कर्जाच्या रकमेंतून तें कापून घेतलें जातें. खालील तक्त्यावरून, कर्जावर हप्ते कसे बसतात ह्याची कल्पना येईल :–

| मुदत | कर्जाची रक्कम रु. | डिस्कौंट रु. | दिली जाणारी निव्वळ रक्कम रु. | मासिक परत फेड रु. |
|---|---|---|---|---|
| ३० महिने | १,२०० | १८० | १,०२० | ४० |
| २४ ,, | १,२०० | १४४ | १,०५६ | ५० |
| १८ ,, | १,८०० | १६२ | १,६३८ | १०० |
| १२ ,, | १,२०० | ७२ | १,१२८ | १०० |
| ६ ,, | १,२०० | ३६ | १,१६४ | २०० |

व्याज आगाऊ कापून घेतलें जात असल्याकारणानें, प्रत्यक्ष पडणाऱ्या व्याजाचा दर ७ ते ९% च्या दरम्यान येतो. कर्जदारानें मुदतीपूर्वी कर्जफेड केली, तर त्याला रिबेट मिळून त्याची व्याजांत बचत होते. हप्ता वेळेवर भरला गेला नाहीं, तर तो महिना संपण्याच्या आंत प्रत्येक रुपयावर १ नवा पैसा दंड घेऊन हप्ता स्वीकारला जातो. कर्जदारानें करार पाळला नाहीं, तर बँकेस जिन्नस उचलून नेता येतो. कर्जफेड होण्यापूर्वी कर्जदार मृत्यु पावला, तर त्याच्या कुटुंबावर त्याचा बोजा पडूं नये, म्हणून कर्जदाराला विमा पॉलिसी घेऊन ती पॉलिसी बँकेस असाइन करून द्यावी लागते.

देना बँकेच्या योजनेचीं दुसरीं कांहीं वैशिष्ट्यें आहेत. कर्जाची कमाल मर्यादा ५,००० रु. ठेवण्यांत आली आहे. परत फेडीची मुदत ६ महिने ते २४ महिने आहे. १२ महिन्यांपेक्षा कमी मुदतीच्या कर्जावर ५½% आणि १२ ते २४ महिने मुदतीच्या कर्जावर ६% व्याज आहे. इंडियन ओव्हरसीज बँकेच्या योजनेंत, खरेदी केलेला जिन्नस त्या बँकेकडे तारण म्हणून रहातो; देना बँकेच्या योजनेंत जिन्नस तारण घेतला जात नाहीं. कर्जफेडीच्या आधी कर्जदाराचा मृत्यु झाला, तर कर्जाची वसुली कर्जदाराच्या आयुष्याच्या विम्यांतून केली जाईल. त्यासाठी त्याचा विमा उतरविला जाईल. विम्याचे हप्ते कर्जदार भरेल, पण त्यांची रक्कम कर्ज देतांनाच बँक कापून घेईल. कर्जदारानें मुदतीच्या आधी कर्ज फेडलें, तर देना बँक व्याजांत सूट देणार नाहीं. ही योजना प्रथम मुख्य कचेरींत सुरू होईल; पण शाखांतील गिऱ्हाइकांना मुख्य कचेरीच्या द्वारां कर्ज मिळूं शकेल.

---

## आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या कार्याचा वार्षिक आढावा

आयुर्विमा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन् ह्यांनीं कॉर्पोरेशननें १९५८ सालीं केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे. त्यासबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, अहवालाच्या सालीं कॉर्पोरेशननें ३४४·६८ कोटी रुपये किंमतीचीं नवीन विमापत्रकें दिलीं. नव्या धंद्याबाबत हा उच्चांक आहे. नव्या विमापत्रकांची संख्या १० लाखांच्या जवळपास आहे. १९५७ मधील नव्या धंद्याशीं तुलना करतां धंद्यांत २२ टक्क्यांनीं वाढ झाल्याचें दिसून आलें. हिंदी आयुर्विमा व्यवसायांत एका वर्षी ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक नवा धंदा केल्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. १९५७ सालअखेर कॉर्पोरेशननें ३८१·४६ कोटी रुपयांच्या रकमेची गुंतवणूक केलेली होती. १९५८ सालअखेर गुंतवणूक केलेल्या रकमेचा आंकडा ४१४ कोटीपर्यंत वाढला. गुंतवणुकीचा तपशील असा आहे. २०१ कोटी रुपये मध्यवर्ती सरकारच्या रोख्यांत, ५५ कोटी रुपये राज्य सरकारांच्या रोख्यांत, ३९ कोटी रुपये इतर योग्य प्रकारच्या रोख्यांत, ७५ कोटी रुपये डिबेंचर्समध्यें व शेअर्समध्यें, १३ कोटी रुपये मालमत्तेच्या गहाणाच्या तारणांवर दिलेल्या कर्जांत, २१ कोटी रुपये कॉर्पोरेशननें घरावर दिलेल्या कर्जांत, १० कोटी रुपये परदेशी सरकारांचे

ठेले व इतर संकीर्ण बाबी. सध्या गहाणाच्या तारणावर कर्जे देणें बंद करण्यांत आलेलें आहे. जनता पॉलिसीबाबत समाधानकारक प्रगति होत आहे. १९५८ सालीं १·६१ कोटी रुपयांच्या जनता पॉलिसीज देण्यांत आल्या तर १९५७ सालीं १·१७ कोटी रुपयांच्या देण्यांत आल्या होत्या. विमेदारांना बोनस देण्याबाबतच्या तपासिशाची तयारी करण्यांत येत आहे. बहुधा येत्या तीन–चार महिन्यांत बोनस जाहीर करतां येईल, असें वाटतें.

परदेशांत कॉर्पोरेशनचा धंदा विशेष लक्षांत भरण्यासारखा नाहीं. पूर्व आफ्रिका व इतर कांहीं ठिकाणीं धंदा मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत आले. त्याचा परिणाम म्हणून १९५९ सालीं परदेशांतील धंद्यांत वाढ होऊं लागली आहे. कॉर्पोरेशन पाकिस्तान, ब्रह्मदेश, सिलोन आणि इंडोनेशिआ ह्या देशांत धंदा करीत नाहीं. ह्यापैकी कांहीं देशांत परिस्थिति अस्थिर आहे. शिवाय परदेशी चलनाबाबतच्या अडचणीहि आहेतच. पूर्व आफ्रिका, सिंगापूर, हाँगकाँग, मलाया आणि फिजी बेटें ह्या देशांत धंदा करण्यांत येत आहे. कॉर्पोरेशन आपल्या नोकरवर्गासाठी येत्या पांच वर्षांत घरें बांधणार आहे. ह्या कामासाठी १२ कोटी रुपयांची रक्कम बाजूला काढून ठेवण्यांत आली आहे. कॉर्पोरेशनच्या घरबांधणीच्या ह्या योजनेमुळें प्रत्येक विभागांतील ५० टक्के नोकरांचा फायदा होईल. कॉर्पोरेशनच्या पैसे गुंतवणुकीच्या कार्यास मदत व्हावी म्हणून एक संशोधन विभाग स्थापन करण्यांत आला आहे. कॉर्पोरेशनतर्फे काढण्यांत आलेल्या पत्रकांत धंद्यासंबंधीं तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. १९५८ सालीं कॉर्पोरेशननें ३४४·६८ कोटी रुपयांचा नवा धंदा केला. त्यापैकी ५॥ कोटी रुपयांचा धंदा भारताबाहेरील होता व उरलेला ३३९ कोटी रुपयांचा भारतामधील होता. त्यांत १·६१ कोटी रुपयांच्या जनता पॉलिसीचा अंतर्भाव होतो. १९५७ सालीं ८,००,००० पॉलिसीज देण्यांत आल्या. १९५८ सालीं त्यांची संख्या ९,६०,००० झाली. विभागशः झालेल्या धंद्याची नोंद अशी आहे. उत्तर विभाग: ४३ कोटी. ह्या विभागांत १९५७ च्या मानानें २६·८५ टक्के वाढ झाली. मध्य विभाग ४४ कोटी, वाढ २३ टक्के; पूर्व विभाग ७९ कोटी, वाढ १६ टक्के; दक्षिण विभाग ९० कोटी, वाढ २२ टक्के; पश्चिम विभाग ८३ कोटी, वाढ २६·९५ टक्के. भारताबाहेर करण्यांत आलेल्या धंद्यांत फारच थोडी वाढ झालेली आहे. जनता पॉलिसीचें काम कांहीं निवडक भागांत चालू करण्यांत आलें होतें. १९५८ सालीं ह्या प्रकारच्या कामांत ३७ टक्के वाढ झालेली आहे. निरनिराळ्या विभागांत देण्यांत आलेल्या पॉलिसींच्या सरासरी किंमतींत बरीच तफावत दिसून येते. उत्तर विभागांत सरासरी ४,६०० रुपये किंमतीची पॉलिसी देण्यांत आली. मध्य विभाग व पश्चिम विभाग ह्यामधील पॉलिसींची सरासरी ४,००० रु. पेक्षा थोडी अधिक पडते. पूर्व विभागांतील सरासरी पॉलिसीची रक्कम ३,६०० रुपये पडते आणि दक्षिण विभागांतील पॉलिसींची सरासरी रक्कम २,७०० रु. पडते. भारताबाहेर देण्यांत आलेल्या पॉलिसींची सरासरी रक्कम १०,००० रु. पेक्षा अधिक पडते.

### विम्याच्या प्रसाराचे बहुविध प्रयत्न

ज्या प्रदेशांकडे कोणत्याहि विमा कंपनीनें लक्ष दिलें नव्हतें, अशा प्रदेशांत कॉर्पोरेशननें ७४ नव्या कचेऱ्या उघडल्या. त्यामुळें कॉर्पोरेशनचा कारभार पूर्वी अस्तित्वांत असलेल्या ३३ विभागीय कचेऱ्या व ५ प्रादेशिक कचेऱ्यांबरोबर २२१ शाखा व ९९ उप-शाखांतर्फे पाहिला जाऊं लागला. विमेदारांना अधिक सोईचें व्हावें म्हणून अधिकाधिक कचेऱ्या उघडण्याचा संकल्प कॉर्पोरेशननें केला आहे. योजनाबद्ध आंखणी करून कॉर्पोरेशननें ग्रामीण भागांतून अनेक पॉलिसी खपविल्या व भारतीय विमा-व्यवसायाच्या इतिहासाचें एक नवें पान उघडलें. पहिलाच प्रयत्न म्हणून कॉर्पोरेशननें १९५८ च्या नोव्हेंबरमध्यें, राजस्थान सरकारच्या सहकार्यानें तेथील २४ समाज–विकास–गटांत जोरदार प्रचार करून १,००,००,००० रुपयांच्या विमा-पॉलिसी खेडुतांना घ्यावयास लावल्या. १९५९ मध्यें, असाच प्रयत्न सर्वत्र करण्यांत येणार आहे. बिहार, केरळच्या सरकारांनीं तर संपूर्ण सहकार्याचें आश्वासन आतांच देऊन ठेवलें आहे. प्रत्येक प्रदेशांत विमा विक्री व व्यवसायाचें शास्त्रशुद्ध शिक्षण देणारीं केंद्रें कॉर्पोरेशननें स्थापन केलीं. कांहीं विभागांच्या मध्यवर्ती ठिकाणांतहि अशींच केंद्रें चालविण्याचा कॉर्पोरेशनचा विचार आहे. याच कालांत, कॉर्पोरेशननें सॅलरी सेविंग, सुपर ॲन्युएशन सारख्या खास योजनांचा विशेष प्रचार केला. त्यामुळें, आज भारतांतील अनेक कचेऱ्यांनीं त्यांच्याकडे काम करणाऱ्या व्यक्तींचे हप्ते पगारांतून कापून सरळ कॉर्पोरेशनकडे पाठविण्याच्या योजनेस मान्यता दिली आहे. त्यादृष्टीनें, वेतन कायद्यांतील दुरुस्ती व कमींत कमी वेतनाचे मध्यवर्ती नियम हे कॉर्पोरेशनला खूपच साहाय्यक झाले आहेत.

राष्ट्रीय शिलकेंत वाढ होण्याकरितां कॉर्पोरेशननें एक पंचवर्षीय योजना आंखली आहे. योजनेची रूपरेषा जरी निश्चित व्हावयाची असली, तरी योजनेच्या पांचव्या वर्षांत १,००० कोटींचा विमा-व्यवसाय व्हावा, असा उद्देश आहे. ह्याचाच अर्थ असा कीं, त्याकरितां देशाच्या कानाकोपऱ्यांत अनेक शाखा-उपशाखा काढाव्या लागणार व जरूर पडल्यास विभागीय कचेऱ्या वाढवाव्या लागणार. देशांतील प्रत्येक लायक माणसास आयुर्विम्याचा फायदा मिळवून देण्याचें कॉर्पोरेशनचें उद्दिष्ट, ह्यामुळें लवकरांत लवकर पुरें होऊं शकेल, अशी अपेक्षा आहे.

---

**काश्मीर सरकारची योजना**—काश्मीरमध्यें हलक्या प्रतीचा कोळसा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होण्यासारखा आहे. ह्या कोळशाचा उपयोग करून रंग, रसायनें, खतें व ज्वालाग्राही वायु निर्माण करण्याचे कारखाने काढण्याचा विचार काश्मीरचें सरकार करीत आहे. त्याशिवाय वीज निर्मिति केंद्रहि उभारण्याचा विचार करण्यांत येत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या औद्योगीकरणाचा समावेश करण्यांत आल्यास त्यासाठी ७ कोटी रुपये खर्च येईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# १९५९–६० चें आर्थिक वर्ष

करांच्या चालू दरानें येत्या वर्षांत एकूण महसुली उत्पन्न ७५७·५१ कोटी रु. तर एकूण महसुली खर्च ८३९·१८ कोटी रु. होईल असा अंदाज करण्यांत आला असल्यानें ८१·६७ कोटी रुपयांची तूट राहते. आयातींवरील निर्बंध चालू राहणार असल्यानें जकातीचें उत्पन्न कमी कमी येत राहण्याची परिस्थिति कायम राहणार आहे. पुढील वर्षांत १३० कोटी रु. जमा होतील. चालू वर्षाचा हा दुरुस्त आंकडा १३६ कोटी रु. आहे. पुढील वर्षांत मध्यवर्ती अबकारी करांपासून ५·८५ कोटी रु. अधिक मिळण्याची शक्यता आहे; त्याचप्रमाणें कॉर्पोरेशन टॅक्स व प्राप्तीकर यांपासूनहि ६·५० कोटी रु. अधिक मिळण्याची शक्यता आहे; अशा रीतीनें इतर प्रमुख खात्यांकडून होणारें उत्पन्न जवळजवळ यंदा इतकेंच होण्याचा अंदाज असून एकंदरींत या खात्यांचें उत्पन्न सुमारें ७·२ कोटी रु. वाढेल असें वाटतें. इतर खात्यांकडून चालू वर्षापेक्षा एकूण २५·२६ कोटी रु. अधिक उत्पन्न अपेक्षित आहे तर टपाल व तार खात्याकडून मिळणारें उत्पन्न १·८ कोटी रुपयांनीं कमी व्हावें असें वाटतें. रेल्वेकडून महसुलांत जमा होणारी रक्कम ४२ लक्ष रु. नीं कमी असेल. प्राप्तिकर, वारसाकर व रेल्वे उतारूंच्या भाड्यावरील कर यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांतील राज्यसरकारांना त्यांचा वाटा म्हणून ९२·२२ कोटी रु. द्यावे लागतील. चालू वर्षाचा हाच आंकडा ८९·०७ कोटी रु. आहे. विभागणीयोग्य अबकारी करामधील राज्यांच्या वाट्याच्या रकमेची तरतूद खर्चाबाबतच्या अंदाजांत केलेली आहे. पुढील वर्षी मुलकी कारभाराचा खर्च ५९६·५ कोटी रु. आणि संरक्षणखर्च २४२·६८ कोटी रु. होईल असा अंदाज आहे.

मुलकी खर्चात ७५·२२ कोटी रु. नीं झालेल्या वाढीचें स्पष्टीकरण असें आहे कीं, पी. एल. ४८० कार्यक्रमाखाली मिळालेली आर्थिक मदत जी प्रारंभीं महसुली खात्यांत जमा केलेली होती ती नंतर खास विकास निधींत घ्यावी लागली व त्या निधींतून पुढील खर्चासाठी वापरावी लागली. अशा रीतीनें या निधींत रक्कम घेण्यासाठी पुढील वर्षी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. यंदाच्या दुरुस्त अंदाजांत हीच रक्कम १ कोटी रु. धरलेली आहे. सरकारी कर्जाच्या रकमा वाढत असल्यानें कर्जावरील खर्चहि चालू वर्षापेक्षा १५·८२ कोटी रुपयांनीं वाढेल. कारभारात्मक यंत्रणेचा खर्चहि एकूण अडीच कोटी रु. नीं वाढण्याचा संभव आहे. पंचवार्षिक योजनेच्या खर्चात विकासकार्यें आणि समाजसेवाकार्यें यांकरतां बरीच तरतूद करण्यांत आली असून, त्यासाठी पुढील वर्षी एकूण १६८ कोटी रु. खर्च येईल असा अंदाज आहे. यंदाचा याबाबतचा खर्च सुमारें १४५¾ कोटी रु. आहे. समाज विकास योजनांसाठी या वर्षाच्या रकमेपेक्षा ६·१७ कोटी रुपयांनीं जास्त तरतूद करावी लागेल. अनुसूचित जनजाति आणि विभाग व मागासलेल्या जमाती यांच्या हितसंवर्धन-कार्यासाठी राज्यांना मदत देण्याकरितां अर्थसंकल्पांत एकूण साडेपांच कोटी रुपयांची वाढीव तरतूद केलेली आहे.

गेल्या वर्षातील संरक्षण खर्च चालू वर्षातील अशा खर्चापेक्षा २४·१९ कोटी रु. नीं कमी होईल. एकूण खर्चात १९·५५ कोटी रु. कमी खर्च झाल्यानें व ४·६४ कोटी रु. इतर जमा व वसुली झाल्यानें ही सुधारणा शक्य झाली आहे.

### भांडवली खर्च

पुढील वर्षासाठी अंदाजिण्यांत आलेल्या ४२० कोटी रु. भांडवली खर्चात आंतरराष्ट्रीय नाणें-निधीला वाढत्या दरानें द्याव्या लागणाऱ्या वर्गणीपोटीं खर्च होणाऱ्या ९५·२४ कोटी रुपयांचा अंतर्भाव आहे. जागतिक बँक व नाणें निधि या दोन संघटनांनीं आपल्या साधनांत वाढ करण्याची शिफारस केल्यानें या संघटनांच्या संचालक-मंडळानें सदस्यांच्या वर्गणींत ५० टक्के वाढ करण्याची शिफारस केल्यानें ही गोष्ट करावी लागत आहे. या वर्षी रेल्वेसाठी १२२ कोटी रु. खर्च होणार आहेत. चालू वर्षाचा हाच आंकडा १२१ कोटी रु. आहे. संरक्षण-खात्याचा भांडवली खर्च गेल्या वर्षांत ३२·७४ कोटी रु. म्हणजे चालू वर्षापेक्षा सुमारें ५ कोटी रु. नीं जास्त होणार आहे. टपाल व तार खात्यावर पुढील वर्षी येत्या वर्षापेक्षा ४। कोटी रु. जास्त खर्च होण्याची अपेक्षा आहे. तसेंच पुढील वर्षांत अन्नधान्यखरेदीवर २ कोटी रु. जास्त खर्च व्हावा. त्याचप्रमाणें निरनिराळे औद्योगिक धंदे, नागरी विमानवाहतूक, नागरी बांधकामें, दंडकारण्य योजना व विकास मदत यांसाठीहि अधिक पैशाची तरतूद करण्यांत आली आहे. सरकारच्या इतर भांडवली गरजांत कर्जें आणि आगाऊ रकमा देण्याच्या तरतुदींचा अंतर्भाव आहे. राज्य सरकारांना त्यांच्या विकास योजनांवर कर्जें देण्यासाठी ३१३ कोटी रु. ची रक्कम असेल. चालू वर्षी यासाठी ३२७ कोटी रु. रकमेची तरतूद केली होती. त्याखेरीज, पोर्ट ट्रस्टस्, कायदेशीर स्थापना करण्यांत आलेलीं कॉर्पोरेशनें, सरकारी कंपन्या, इ. ना कर्जें देण्याकरितां या वर्षी १२३ कोटी रु. व पुढील वर्षासाठी २१२ कोटी रु. लागतील. हिंदुस्थान पोलाद कारखान्याला कर्ज देण्यासाठी यंदा ५२ कोटी रु. ची व पुढील वर्षासाठी १२२ कोटी रु. ची तरतूद करण्यांत आली आहे. तसेंच रेल्वेहि आपल्या विकास निधीसाठी या वर्षी १०·९८ कोटी रु. व पुढील वर्षी १०·८८ कोटी रु. चें कर्ज घेईल. ह्या कर्जाची नंतर परतफेड करण्यांत येईल.

### योजनेसाठी खर्च

यानंतर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कामावर खर्च करण्यांसाठी व तिच्या एकूण खर्चासाठी अर्थसंकल्पांत कशी तरतूद करण्यांत आली आहे त्याची माहिती अशी. योजनेच्या अंमलबजावणीकरतां अर्थसंकल्पांत एकूण ८४३ कोटी रु. ची तरतूद करण्यांत आली असून त्यापैकी १५० कोटी रुपये महसुली अर्थसंकल्पांतून आणि ६९३ कोटी रु. भांडवली अर्थसंकल्पांतून घेतलेले आहेत. याशिवाय रेल्वे आपल्या उत्पन्नांतून ३९ कोटी रु. आणि राज्य सरकारें २३९ कोटी रु. खर्च करतील. अशा रीतीनें योजनेवरील एकूण खर्च १,१२१ कोटी रु. होईल. या रकमेंत बांधकामाच्या मुदतींत भांडवली खर्चाकडे घेतलेल्या धरण-योजनांच्या कर्जावरील आणि अल्प मुदतीच्या कर्जावरील व्याजाच्या रकमेचा अंतर्भाव होतो.

साधनसंपत्तीविषयक परिस्थिति पुढील दोन वर्षांत मागल्या-प्रमाणेंच बिकट राहण्याचीं चिन्हें असून विकासासाठी वाढ करण्यासाठी आणखी बराच प्रयत्न करण्याची जरूरी आहे. आतांपर्यंत केलेल्या प्रयत्नानंतरहि सरकारी खजिन्यांत जमा होणारें राष्ट्रीय उत्पन्नाचें मान अद्याप कमीच आहे. परकीय मदत आपणांस बऱ्याच प्रमाणांत मिळत असली व त्यांतून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील बरींचशीं कामें पार

पडणार असलीं तरी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत आपणांस या रकमांचे मोठाले हप्ते द्यावे लागतील ही गोष्ट आपण ध्यानांत घेतली पाहिजे आणि ही गोष्टच उत्पादनसाधनांत वाढ करण्याची किती गरज आहे तें दाखवितें.

### तिसरी पंचवार्षिक योजना

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा यापूर्वींच विचार होण्यास सुरुवात झाली असली तरी तिच्या व्याप्तीबद्दल सध्यांच कल्पना बांधणें अकालींच ठरेल. या योजनेची एकूण व्याप्ति, पैशाचें वांटप, उत्पन्नाचीं साधनें उभारण्याच्या पद्धती, परकीय साह्याच्या आवश्यकतेचें प्रमाण व उपलब्धता हे प्रश्न परस्परांशीं निगडित असून त्यांचा अभ्यास करण्यांत येत आहे. तथापि, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आपण निश्चित प्रगति करण्यासाठी उत्पन्नाच्या प्रत्येक क्षेत्राचा शोध करणें आवश्यक आहे हें अगदीं स्पष्ट आहे. विकासाची अवस्था सतत टिकून राहील व ती स्वावलंबी होईल अशी परिस्थिति आपल्या आर्थिक व्यवस्थेंत निर्माण करणें हें आपलें उद्दिष्ट असलें पाहिजे.

### कर्जें व बचती

गेल्या दोन–तीन वर्षांपेक्षा चालू वर्षात जनतेकडून कर्जें मिळण्याची परिस्थिति कितीतरी जास्त समाधानकारक आहे. येत्या वर्षांत अशा कर्जाद्वारें मूळ अंदाजांतील १२५ कोटी रु. ऐवजीं १८१ कोटी रु. मिळतील. ट्रेझरी बिलांद्वारां अल्पमुदतीसाठी पैसा गुंतविण्याची परिस्थितीहि स्वागतार्ह वाटावी इतकी सुधारलेली आहे. चालू वर्षाअखेर जनतेकडे एकूण २५ कोटी रु. ची ट्रेझरी बिलें असण्याची अपेक्षा आहे.

दुसऱ्या व्हिक्टरी लोनची मुदत पूर्ण झाल्यानें ११० कोटी रु. ची. परतफेड करावी लागेल ही गोष्ट लक्षांत घेऊन व पुढील वर्षासाठी जनतेकडून २२५ कोटी रु कर्ज मिळेल असा अंदाज केला आहे. त्याचप्रमाणें ट्रेझरी बिलांतहि १५ कोटी रु. ची वाढ गृहीत धरली आहे. छोट्या बचतींचा विचार करतां ८५ कोटी रु. जमा होण्याची अपेक्षा असून सध्यांच्या अंदाजानुसार पुढील वर्षी ३३७ कोटी रु. परकीय मदत मिळेल असें वाटतें.


नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबतच्या केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियमानुसार (क्र. ८)
"अर्थ" संबंधीं प्रकटन

(१) प्रकाशन स्थळ — ८२३ शिवाजीनगर, पुणें ४.

(२) नियतकालिकाचें स्वरूप — दर बुधवारीं प्रसिद्ध होणारें साप्ताहिक.

(३) मुद्रकाचें नांव — केशव गणेश शारंगपाणी
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : ९१५/१ शिवाजीनगर पुणें ४.

(४) प्रकाशकाचें नांव — श्रीपाद वामन काळे
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : ८२३, शिवाजीनगर पुणें ४.

(५) संपादकाचें नांव — श्रीपाद वामन काळे
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : ८२३, शिवाजीनगर पुणें ४.

(६) नियतकालिकाचे मालक, भागीदार, शेअरहोल्डर्स, इत्यादींचीं नांवें व पत्ते : श्रीपाद वामन काळे ८२३, शिवाजीनगर, पुणें ४.

मी, श्रीपाद वामन काळे, असें प्रकट करतों कीं, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणें खरा आहे.

दि. १।३।१९५९ श्री. वा. काळे


## १९५९–६० च्या करयोजना

कंपन्यांवरील संपत्ति-कर व जादा नफ्यावरील कर रद्द.

व्यक्तींवरील व अविभक्त हिंदु कुटुंबावरील संपत्तिकरांत वाढ.

वैयक्तिक प्राप्तीवरील कराच्या दरांत बदल नाहीं.

अनेक वस्तूंवरील अबकारी करांत फेरफार.

नव्या कर योजनांमुळें २३·३५ कोटी रु. मिळण्याची अपेक्षा.

| | १९५८–५९ (अर्थसंकल्प) | १९५८–५९ (दुरुस्त) | १९५९–६० (अर्थसंकल्प) |
|---|---|---|---|
| | (आंकडे कोटी रुपयांचे) | | |
| महसूल | ७६७·९९ | ७२८·२० | ७५७·५१ |
| | | | २३·३५ (अर्थसंकल्पांतील कर-योजनांच्या परिणामामुळें) |
| खर्च | ७९६·०१ | ७८८.१५ | ८३९·१८ |
| तूट | २८·०२ | ५९·९५ | ५८·३२ |

लोकसभेस अर्थसंकल्प सादर करतांना अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनीं कंपन्यांवरील करांत सोपेपणा आणण्याच्या हेतूनें कंपन्यावरील संपत्तिकर आणि जादा नफ्यावरील कर रद्द करण्यांत आला असल्याची घोषणा केली. कंपन्यांवरील प्राप्तिकर, सुपरटॅक्सच्या दरांतच प्राप्तिकर, जादा नफ्यावरील कर व संपत्तिकर एकत्रित करण्याचा आपला विचार असल्याचें ते म्हणाले. प्राप्तिकर कायद्यान्वयें कंपन्या करीत असलेल्या कराच्या आगाऊ भरण्याच्या बाबतींत अपेक्षित प्राप्तिकराच्या रकमेच्या २० टक्के रक्कम व सुपरटॅक्सच्या बाबतींत २५ टक्के रक्कम भरणा भरण्याची तरतूद करण्याचा विचार असल्याचें त्यांनीं सांगितलें. कंपन्यांवरील संपत्ति व नफ्यावरील करांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाइतकेंच उत्पन्न या दरामुळें मिळेल. कंपन्यांवरील करांतील या बदलाचा विभागणीयोग्य एकूण कर-उत्पन्नावर परिणाम होणार नाहीं. १९६०–६१ मध्यें सध्यां एकूण कर-उत्पन्नांतून मिळणाऱ्या कराच्या उत्पन्नाचा भाग कांहीं तांत्रिक बाबींमुळें विभागणीयोग्य मानण्यांत येणार नाहीं. तथापि या प्रश्नावर भावी काळांतील फिनान्स कमिशननें विचार करून त्याचा निर्णय मिळेपर्यंत प्राप्तिकरांतील त्यांचा वांटा म्हणून राज्यांना मिळणारी रक्कम, वर उल्लेखिलेला बदल झालाच नाहीं असें धरून, सध्यां इतकीच देण्यांत येईल. ज्या परकीय कंपन्या भारताबाहेर डिव्हिडंड जाहीर करतील त्यांच्या बाबतींत ही योजना लागू होणार नाहीं. तथापि कंपन्यांवरील संपत्तिकर रद्द करण्यांत आल्याकारणानें त्यांना लागू असलेल्या करांच्या दरांत कांहीं फेरफार करण्याची जरूरी आहे. या कंपन्यांच्या बाबतींत सध्यांचा कर ६१·६ टक्के आहे तो १९६०–६१ पासून ६३ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा विचार आहे.

कंपन्यांच्या नफ्याच्या व डिव्हिडंडच्या सध्यांच्या पद्धतींत बदल करण्याच्या आपल्या योजनेच्या कांहीं ठळक मुद्यांची रूपरेषा ना. मंत्र्यांनीं सांगितली. ते म्हणाले, कंपनीनें भरलेला प्राप्तिकर शेअरहोल्डरनें दिला असें धरण्याची आणि त्यांना मिळणाऱ्या डिव्हिडंडची रक्कम एकत्रित करण्याची गुंतागुंतीची पद्धति रद्द

करण्यांत येतील. भारतीय कंपन्यांना लागू असलेल्या कराचे दर असे नक्की करण्यांत येतील कीं, त्यामुळें शेअर-होल्डरांना सध्यां दिली जाणारी वार्षिक रक्कम वजा करतां येणाऱ्या चालू वार्षिक उत्पन्नाइतकेंच या करांचें उत्पन्न येईल. कंपन्यांकडून देण्यांत येणाऱ्या करांशीं शेअर–होल्डरनें भरावयाच्या कराचा कांहींहि संबंध यापुढें जोडण्यांत येणार नाहीं. शेअर–होल्डरांचा विचार करतां कंपन्या आतां ठराविक समान दरानें कर वजा करून तो सरकारकडे भरतील. सध्यां सरकारी रोख्यांवरील व्याजाच्या बाबतींत करतात त्याप्रमाणें या कराची रक्कम शेअर–होल्डरांच्या उत्पन्नावरील आकारणीच्या वेळीं ती रक्कम परत करण्यांत येईल. छोट्या शेअरहोल्डरांना करमाफीपत्रकें देण्याची योजना तयार करण्याची कल्पना आहे. म्हणजे त्यांच्या बाबतींत पैसे परत करण्याचा प्रश्न निर्माण होणार नाहीं. सदर योजना १९५९–६० व १९६०–६१ या मुदतींत दोन टप्प्यांत अंमलांत आणली जाईल. कंपनीकर-आकारणीसंबंधींहि अर्थमंत्र्यांनीं आणखी बदल जाहीर केला. सध्यां साऱ्या बोनस इश्यूंच्या बाबतींत कर-आकारणी होत असली तरी शेअर प्रिमियम खात्यामधून दिल्या जाणाऱ्या बोनस इश्यूंच्यावर कर-आकारणी होत नाहीं. इतर बोनस इश्यूप्रमाणेंच १९६०–६१ पासून याहि बोनस इश्यूंवर कर बसविण्याचा विचार आहे. नव्या योजनेमुळें जरूर असलेले जे आणखी कांहीं थोडे बदल प्राप्तिकर कायद्यांत करावे लागतील तें फायनान्स बिलांत समाविष्ट केलेले आहेत. व्यक्तींच्या प्राप्तिकराच्या प्रचलित दरांत आणि चौकटींत कोणताहि बदल अर्थमंत्र्यांनीं सुचविलेला नाहीं.

पुढील वर्षापासून व्यक्ति आणि अविभक्त हिंदु कुटुंबें यांनीं द्यावयाचा संपत्तिकर दर श्रेणींत अर्ध्या टक्क्यानें वाढविण्यांत येईल. नवीन दर असे राहतील:—दोन लक्षांहून अधिक परंतु १२ लक्ष रुपयांपर्यंतच्या संपत्तीवर १ टक्का, १२ ते २२ लक्ष रुपयांपर्यंत १॥ टक्का व त्यापुढील कोणत्याहि रकमेसाठी २ टक्के अविभक्त हिंदु कुटुंबांच्या बाबतींतहि असे बदल करण्यांत येतील.

सर्व करांच्या संबंधांत श्री. मोरारजी देसाई म्हणाले कीं, प्रचलित कायदा कांहीं प्रमाणांत कडक केला पाहिजे आणि म्हणून आतां मिळत असलेली कांहीं बाबतींतली सूट आतां रद्द करण्याचा विचार आहे. विशेषत: कर आकारण्यांत न येणाऱ्या खर्चाचा विचार करतां ३०,००० रुपयांपर्यंतच्या खर्चाच्या बाबतींत देण्यांत येणारी कराची सूट मिळण्यासाठी पति-पत्नी व अज्ञात मुलें यांस, त्यांस प्रत्येकाचें स्वतंत्र उत्पन्न असल्यास, निरनिराळ्या करपात्र व्यक्ति न समजतां एकच करपात्र व्यक्ति समजण्याची तरतूद करण्याचा विचार आहे.

### अप्रत्यक्ष कर

अप्रत्यक्ष करांचा विचार करतां अबकारी करांचे सध्यांचे दर व त्यामध्यें मिळणाऱ्या सवलती यांतच बहुतांशीं फेरबदल करण्यांत येतील. निरनिराळ्या राज्यांत या करांपासून मिळणारें उत्पन्न वगळतां या फेरबदलामुळें १८·०८ कोटी रु. उत्पन्न होईल.

### रिफाइण्ड डिझेल ऑइल्स् व व्हेपरायझिंग ऑइल्स

या तेलांवरील दर इंपिरिअल गॅलनवरील ४० नये पैसे असा वाढविण्यांत येत आहे. त्यामुळें लो स्पीड डिझेल ऑइलवरील अबकारी करांतहि, दर टनावरील ४० रुपयांवरून ५० रुपयांपर्यंत वाढ करण्यांत येत आहे. या दोन उपाययोजनामुळें दरवर्षी उत्पन्नांत ७·८५ कोटी रु. वाढ होईल.

### कित्रिम रेशमी कापड

कित्रिम रेशमी कापडावरील अबकारी कर दर चौरस वारास ६ पै आहे तो ६ नये पैसे असा वाढविण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें सध्यां पहिल्या ९ मागांवर झालेल्या उत्पादनावर कर घेण्यांत येत नाहीं ती सवलत आतां फक्त पहिल्या ४ मागांवरील उत्पादनासच देण्यांत येईल. यामुळें उत्पन्नांत दरवर्षी एक कोटी रु. वाढ होईल. त्याचप्रमाणें यामुळें राज्य सरकारांस जादा करापासून २० लाख रुपये उत्पन्न होईल.

रेयॉन सूत आणि स्टेपल फायबर यांवरील अबकारी करांत ६० टक्के वाढ करण्यांत येत असल्यानें ५० लाख रु. उत्पन्न वाढेल.

### मोटारींचे टायर

मूळ किंमतीच्या ३० टक्के हें करांचें प्रमाण वाढवून मूळ किंमतीच्या ४० टक्के करण्यांत येत आहे. सायकलींच्या टायरवर असलेल्या करांत फेरफार करण्यांत आलेला नाहीं. ही करवाढ केल्यामुळें १·७५ कोटी रु. जादा उत्पन्न येईल असा अंदाज आहे.

### वनस्पति

सध्यांच्या दर हंड्रेडवेटमागें ७ रुपये या दरांत वाढ करून तो दर हंड्रेडवेटास ८·७५ रु. करण्यांत येतील. यामुळें महसूल उत्पन्नांत ९५ लक्ष रुपयांची भर पडेल.

### वनस्पतिजन्य अर्क-विरहित तेलें

सध्यां ह्याप्रकारच्या तेलांच्या बाबतींत विजेवर चालणाऱ्या कारखान्यांना देण्यांत येणाऱ्या सवलती रद्द करण्यांत येत असून पहिल्या ७५ टन उत्पादनाच्या बाबतींतच कराची सूट दिली जाईल. तथापि खेड्यांतील घाण्यावर काढण्यांत येणाऱ्या तेलाच्या बाबतींत ह्या फेरबदलाचा परिणाम होणार नाहीं. नवीन फेरबदलामुळें ४·४ कोटी रु. महसुली उत्पन्नाची भर पडेल असा अंदाज आहे.

### खांडसारी साखर

यावर दर हंड्रेडवेटमागें ५·६० रु. हा प्राथमिक कर बसविण्यांत येईल; शिवाय विक्री–कराऐवजीं ७० नये पैसे हा जादा कर बसविला जाईल. या प्राथमिक करापासून १·८२ कोटी रु. उत्पन्न मिळेल. जादा करापासून २५ लक्ष रु. मिळतील व ते सर्व उत्पन्न राज्यांना मिळेल.

### सिगारेट

सिगारेटवरील करपातळींत १६ टक्क्यांनीं एकंदरीनें वाढ करण्यांत येईल. या फेरबदलामुळें १·५ कोटी रु. उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा आहे.

### तंबाखू

खास जाहीर केल्या जाणाऱ्या तंबाखूच्या प्रकारांवर आणि विड्या तयार करण्यासाठी वापरण्यांत येणाऱ्या तंबाखूच्या प्रकारांवर जादा दरानें कर आकारण्याचे अधिकार देण्यांत येत आहेत. सध्यां कच्च्या तंबाखूवरील करसूचीमुळें पूर्वी जी तंबाखू हुक्का तयार करण्यासाठी वापरली जाई तीच आतां विड्या तयार करण्यासाठी वापरली जात आहे म्हणून हा उपाय योजावा लागला.

### चहा

देशाच्या कांहीं विभागांत होणाऱ्या चहावरील अबकारी

करांच्या दरांत पुन्हां फेरबदल केला जाईल. तसेंच सघ्यांची निर्यात जकात, दर पौंडास २६ नये पैसे आहे ती कमी करून दर पौंडास २४ नये पैसे केली जाईल. यामुळें मध्यवर्ति अबकारी करांपासून ५८ लक्ष रु. जादा उत्पन्न मिळेल. तसेंच निर्यात जकातींपासून मिळणाऱ्या उत्पन्नांत ९३ लक्ष रु. घट येईल. त्याचप्रमाणें उद्योगधंद्यांचा ३५ लक्ष रुपये फायदा होईल.

जकाती करांच्या बाबतींत पाहतां कोणताहि महत्त्वाचा बदल सुचविण्यांत आलेला नाहीं. तथापि ज्या वस्तूंवरील अबकारी कर वाढविण्यांत आले आहेत त्यांवरील आयात करांत त्या प्रमाणांत वाढ होईल यामुळें ३.६५ कोटी रु. जादा उत्पन्न मिळेल. अन्-एक्सपोज्ड फिल्मवरील जकातींत थोडी वाढ करण्याचा विचार असून त्यामुळें ५ लक्ष रु. जादा मिळतील आणि त्याचा लाभ स्थापन करण्यांत येत असलेल्या फिल्म फायनान्स कॉर्पोरेशनला मिळेल. हें उत्पन्न जमेत धरतां जकातकरांपासून होणाऱ्या उत्पन्नांत २.७७ कोटी रुपयांची वाढ होईल.

---

## औद्योगिक व्यवस्थापक विभाग

औद्योगिक व्यवस्थापक विभागासाठी निवड केलेल्या सुमारें ७६ अधिकाऱ्यांना लवकरच नेमण्यांत येणार असल्याचें मध्यवर्ति गृहमंत्री श्री. गोविंद वल्लभपंत यांनीं लोकसभेंत एका प्रश्नास उत्तर देतांना सांगितलें.

निवड केलेल्यांपैकी किती उमेदवारांना या विभागांत समाविष्ट करून घेतलें जाईल व कितीजणांचीं नांवें भरती करावयाच्या यादीवर राहतील या प्रश्नास उत्तर देतांना पं. पंत म्हणाले कीं या योजनेंत सहभागी असलेल्या सरकारी खात्यांच्या मागण्यांवर तें अवलंबून राहील.

भरतीसाठी एकूण १८,९७१ जणांनीं अर्ज केले होते व २६ फेब्रुवारीस त्यांचा निकाल जाहीर करण्यांत आला होता. (या योजनेंत मध्यवर्ति पोलाद, खाणी व इंधन, वाहतूक व दळणवळण, व्यापार व उद्योग हीं खातीं सहभागी आहेत.)

---

## अर्थशास्त्राच्या अभ्यासासाठी रिजफील्ड फाउण्डेशनची शिष्यवृत्ति

अमेरिकेंतील रिजफील्ड फाउण्डेशननें त्या देशांतील सरकारमान्य विद्यापीठांत अर्थशास्त्राचा अभ्यास वा संशोधन करण्यासाठी एका भारतीयास शिष्यवृत्ति देऊं केली आहे. सदर शिष्यवृत्ति एक वर्षापुरती आहे. या मुदतींत उमेदवारास उदरनिर्वाहास व शिक्षणाची फीच्या खर्चासाठी २,५०० डॉलर (१२,५०० रु) मिळतील. भारतांतून अमेरिकेस जाण्या-येण्याचा प्रवासखर्च मात्र खुद्द उमेदवारासच सोसावा लागेल.

उमेदवार अर्थशास्त्रांतील मास्टरची पदवी–परीक्षा किमान दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झालेले असावेत आणि त्यांना विद्यापीठांत किंवा सरकारमान्य शिक्षणसंस्थांत अध्यापनाचा तीन वर्षांचा अनुभव असावा. या विषयाशीं संबंध असलेल्या कारभारात्मक जागीं काम करणाऱ्या उमेदवारांना पसंति दिली जाईल. उमेदवारांचें वय ३० ते ३५ च्या दरम्यान असावें.

मध्यवर्ति सरकार, राज्य सरकारें, विद्यापीठें व त्या तोडीच्या उच्च शिक्षणसंस्था यांत नोकरींत असलेले व त्यांच्या प्रमुखांनीं पुरस्कार केलेले उमेदवारच अर्ज करण्यास पात्र आहेत.

## टोकियो (जपान) येथें भरणारें आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शन

### महाराष्ट्रीय कारखानदारांस सुवर्ण संधि

जपानमध्यें टोकियो येथें दि. ५ ते २२ मे, १९५९ पर्यंत एक आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरणार आहे. या प्रदर्शनांत भारतीय मालाचे नमुने भारत सरकारमार्फत मांडण्यांत येणार आहेत. प्रदर्शनांत ठेवण्याचे मालाचे ४ गट आहेत.

पहिल्या गटांत मुख्यतः कच्च्या मालाचा समावेश केलेला आहे. त्यांत आयर्न ओअर, मँगॅनिज ओअर, लाख, कातडीं, तेलें, इमारती लांकूड, तेलबिया, हिरड्यांचा अर्क, वगैरेंचा समावेश आहे.

दुसऱ्या गटांत चहा, कॉफी, मसाला, काजू, मिरें, साखर व साखरेचे पदार्थ व निरनिराळ्या प्रकारचा तंबाखू यांचा समावेश आहे.

तिसऱ्या गटांत रसायनें, औषधें, रंग, साधीं व कमवलेलीं कातडीं, लोखंडाचीं भांडीं, सतरंज्या, वगैरेंचा समावेश आहे.

चौथ्या गटांत व्यापारी माहितीचे नकाशे, कोष्टकें, त्याचप्रमाणें अर्थशास्त्र, व्यापार व बँकिंग वगैरे बाबतच्या पुस्तकांचा समावेश आहे.

वरील एखाद्या गटांत ज्यांचा माल बसणारा असेल व ज्यांना वरील प्रदर्शनांत माल पाठविण्याची इच्छा असेल अशा कारखानदारांनीं व व्यापाऱ्यांनीं आपल्या पाठवण्याजोग्या मालाच्या यादीच्या ४ प्रति श्री. न. ग. आपटे, ऑर्गनायझर, महाराष्ट्र कारखानदार संघ, ८२/२ सदाशिव पेठ, पुणें २ (पोस्ट बॉक्स नं. ५३३) या पत्त्यावर पाठवाव्यात. त्याचप्रमाणें कारखान्याची माहिती व मालाबाबतचीं प्रमाण–पत्रें, वजन व आकार यांचीहि माहिती पाठवावी. म्हणजे ती भारत सरकारकडे पाठवून त्यांची मान्यता आल्यावर कारखानदारांना अगर व्यापाऱ्यांना कळवून माल पाठविण्याबाबत सर्व माहिती देण्यांत येईल. जास्त माहिती वरील पत्त्यावर मिळेल.

---

## युनिअन बँक लि.

वरील बँकेकडील ठेवी १९५८ मध्यें २०.७३ कोटी रु. वरून २४.६२ कोटी रु. वर गेल्या. कर्जाची रक्कम १०.४० कोटी रु ची १५.७७ कोटी रु. झाली. इन्व्हेस्टमेंट ५ कोटी रु. ची ६.९५ कोटी रु. झाली. बँकेला १६.२५ लक्ष रु. नफा झाला. भागदारांना ८½% करमाफ डिव्हिडंड मिळेल.

---

## पुणें सें. को. बँकेच्या बोर्डाची घटना दुरुस्ती

पुणें सें. को. बँकेची विशेष साधारण सभा दि. १ रोजीं भरली होती. सभेनें, बोर्डानें सुचविलेल्या पोटनियमांतील दुरुस्त्यांचा विचार करून बोर्डाच्या सभासदांची संख्या १९ केली. शेतकी सोसायट्यांचे १०, अर्बन सोसायट्यांचे २, वैयक्तिक भागदारांचे २, मॅनेजिंग डायरेक्टर १, मुंबई स्टेट को. बँकेचा १ व मुंबई सरकारचे ३, अशा १९ सभासदांचें बोर्ड होईल. शेतकी सोसायट्यांचे प्रतिनिधी पूर्वी ८ होते, ते आतां ९ होतील आणि वैयक्तिक सभासदांचे ७ होते ते २ होतील.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.